Anekant Education Society's
# TULJARAM CHATURCHAND COLLEGE
of Arts, Science and Commerce, Baramati, 413102
Autonomous
Religious Minority Institute
NAAC Reaccredited 'A+', CGPA 3.55

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

विषय :- संविधान दिनाचा अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, शुक्रवार दि.२६ नोव्हेंबर, २०२१. रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें "राष्ट्रीय संविधान दिन" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यावेळी "भारतीय संविधानाचे महत्व" या विषयावर भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. प्रशांत विघे सर यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत विघे सर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. या व्याख्यानाचा प्रारंभ दुपारी १:०० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

यावेळी ऑनलाईन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक-गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर उपस्थित होते. या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात विध्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

भारतातील सर्व जात, धर्म, पंथ, वंश, भाषा, प्रांत आणि सांस्कृतिक विविधता आढळून येते. तितक्याच मोठ्या प्रमाणात विषमता आढळून येते. परंतु भारतीय समाजाला एकत्र बांधण्याचे कार्य संविधानाने केले. त्यामुळे भारतीय संविधानाचा विचार कृतीत आणणे आवश्यक आहे. कारण देशाचे संविधान हा सर्वश्रेष्ठ कायदा आहे. असे गौरवोद्गार भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. प्रशांत विघे सर यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी डॉ. प्रशांत विघे सर म्हणाले की, भारतीय नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, सामाजिक न्याय ही मूल्ये भारतीय संविधानाने दिली. भारतीय संविधानामध्ये मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत कर्तव्याचा समावेश केला आहे. भारतीय संविधान हे सर्वसमावेशक असे आदर्श संविधान आहे. संविधानाची निर्मिती ही दूरदृष्टी ठेवून केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाने संविधानाचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. ज्याप्रमाणे मला संविधानाने दिलेल्या अधिकारांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे. त्याच प्रमाणे माझ्यामुळे कुणाच्या अधिकारावर गदा येणार नाही. याची खबरदारी प्रत्येक नागरिकाने घेतली पाहिजे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वोत्तम राज्य व्यवस्थेचा अभ्यास करून भारतीय समाजाला अनुरूप असे संविधान निर्माण केले आहे. असे मत यावेळी डॉ. प्रशांत विघे सर यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर म्हणाले की, भारतीय संविधानाची निर्मिती होत. असताना संविधान कर्त्यांनी जगभरातील लोकशाही मूल्य असलेल्या राज्य व्यवस्थांचा अभ्यास केला. यामध्ये कोणती मूल्य योग्य-अयोग्य? काय नीतिमान-अनितीमान याची चर्चा झाली. जगभरातील आदर्शचा परिपक्क आपल्या संविधाना मध्ये आहे. एक आदर्श समाज निर्मितीसाठी आपण संविधानाचा साक्षेपी अभ्यास केला पाहिजे. भारतीय संविधान हे संपूर्ण मानवजातीसाठी आदर्शवत असे संविधान आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये पुल्लिंग फुलले होते. एका अर्थाने भारतामध्ये रामराज्य येणार होते. असे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांनी व्यक्त केले.

आपले संविधान देशातील प्रत्येक नागरिकांना त्यांचे हक्क आणि अधिकार प्राप्त करून देणारे असे एक घटनात्मक बांधिलकी मान्य केलेले अभिवचन आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपल्या हक्कांविषयी जागृत आहे. त्यामुळे लोकांनी, लोकांसाठी, लोकांच्या मार्फत चालवलेली लोकशाही व्यवस्था ही महत्त्वाची आहे, आपले अधिकार जितके महत्त्वाचे आहे. तितकेच इतरांचे अधिकार देखील महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीला आपले अधिकार देण्याची जबाबदारी आपली आहे. हे सोयीस्करपणे प्रत्येक जण विसरतो. तो पर्यंत आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याची फळे प्रत्येकाच्या पदरात पडणार नाही. त्यामुळे आपण नागरिक म्हणून अधिक जबाबदारीने वागले पाहिजे. असे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांनी यावेळी मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. राजू पांडे यांनी केले. तर आभार डॉ. कैलास मांटे यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा . प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर , उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम , उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

ऑनलाइन राष्ट्रीय संविधान दिन **साजरा झाला. त्याची छायाचित्रे.**





Tuljaram Chaturchand College Baramati

डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख